<u>नि.दि.दा.क्र.१७३/२०१६</u>
नि.क्र.२६९ लगत
दि.०१.०२.२०२५.

**<u>पुढील उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एस. काळे यांच्यातर्फेः–</u>**

१५. माझ्या कुटुंबियांची सर्व माहिती मला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील सहा महिन्याचे असताना त्यांचे आई वडील वारले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ५ रमेश कुंतीलाल मांडोत यांना वडीलोपार्जित मिळकती मिळाल्या होत्या. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र. ५ यांची आई जतनबाई या वडिलोपार्जित मिळकतीची देखभाल करत होत्या अगर कसे. जतनबाई यांच्या मुलांना स्वतंत्र उत्पन्नाचे साधन होते अगर कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गेल्या तीन चार वर्षापासूनच इन्कम टॅक्स भरतो, अगर त्याआधी भरत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील प्रतिवादी क्र. ५ सोबत काम करत होते. हे म्हणणे खरे नाही की, जतनबाई यांचे एकत्र कुटुंब होते. हे म्हणणे खरे आहे की, जतनबाई एकट्याच राहत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यांची मुले त्यांच्याकडे बघत नव्हते हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही पुरावा नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की, औषध दुकान सुरु केले त्यावेळी माझ्याकडे तीन लायसन्स होते आणि तेच पुढे चालू राहिले. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९.०६.२०११ रोजी मी ड्रग डिपार्टमेंट कडे जादा माहिती सादर केल्या. हे म्हणणे खरे आहे की, ड्रग डिपार्टमेंटकडून परमिशन घेण्यासाठी दावा मिळकतीचा पत्ता आणि कागदपत्र हजर केले होते. ते कागदपत्र मी हजर करण्यास तयार आहे. साक्षीदार म्हणतो ते कागदपत्र पटलावर हजर केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, करारपत्र झाल्यापासून ते जतनबाई मयत होईपर्यंत मी वकिलांमार्फत त्यांना नोटीस पाठवून खरेदीखत करून द्या असे सांगितले नाही व त्यासाठी उर्वरित मोबदला ३०००० रुपये दिला नाही. जतनबाई यांचे बँकेत खाते होते याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, जतनबाईच्या वारसांना तीस हजार रुपये स्वीकारून खरेदीखत करुन द्या अशी नोटीस दिली नव्हती. सदरची नोटीस आणि पोचपावती मी पटलावर हजर केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी जतनबाईच्या वारसांना तीस हजार रुपये पाठवले नव्हते. साक्षीदार म्हणतो तीस हजार रुपये देण्याबाबत नमूद केले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते तीस हजार रुपये मी मनीऑर्डरने अथवा चेकने पाठवलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, २००३–०४ साली वादातील दावा मिळकत पाडून तिथे नवीन बिल्डींग उभारण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, जतनबाई यांची जुने घर आता अस्तित्वात नाही. ग्रामपंचायतीत जतनबाई यांच्या वारसांच्या नोंदीविरुध्द मी तक्रार दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचा पशुखाद्य याचा व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की, पुणे विद्यापीठ व इतर

संस्थांविरुध्द मी आजपर्यंत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते कागदपत्र मला मान्य असल्यामुळे मी आजपर्यंत त्यांच्याविरुध्द तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पुणे विद्यापीठाने माझ्या वडीलांना दिलेले पत्र बरोबर आहेत.

**१७.** प्रतिवादींनी पटलावर हजर केलेले कागदपत्र मी पाहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते कागदपत्र मला मान्य आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याविरुध्द यवत पोलिस स्टेशन मार्फत गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे आणि त्यातील कागदपत्र मी पाहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर गुन्ह्यात माझी जामीनावर सुटका झालेली आहे व आजदेखील सदरची केस चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वकिलांनी पाठवलेल्या नोटीसमधील मजकूर मला मान्य आहे.

**वकिलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत.
Sd/-

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः- ०१.०२.२०२५.    सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,दौंड, जि. पुणे.